# द डायरी
# ऑफ
# अ यंग गर्ल


**ॲन फ्रँक**

अनुवाद

**मंजूषा सु. मुळे**



**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**द डायरी ऑफ अ यंग गर्ल :** ॲन फ्रँक
अनुवाद : मंजूषा सु. मुळे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
मंजूषा सु. मुळे
फ्लॅट नं. ४, श्रीयश सोसायटी,
५७१/५७२ केंजळेनगर,
पुणे. मो. नं. : ९८२२८४६७६२

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३७०/-

# प्रस्तावना

एका लहान मुलीने लिहिलेले हे एक असामान्य पुस्तक आहे आणि लहान मुलं सत्य सांगायला घाबरत नाहीत. युद्ध आणि त्याचे माणसांवर होणारे परिणाम यावर अतिशय सुज्ञपणाने आणि ओघवत्या भाषेत केलेलं इतकं सुंदर भाष्य मी आतापर्यंत वाचलेलं नाही. ही मुलगी राहात होती ते पूर्ण शहर हॉलंडच्या ताब्यात असताना, नाझींच्या तावडीत सापडू नये म्हणून लपून राहिलेल्या आठ जणांवर ओढवलेली, पूर्णपणे बदललेली परिस्थिती, त्यांचे सतत घाबरलेल्या अवस्थेत एकांतवासात राहणे, युद्धाच्या भयंकर भीतिदायक अशा बाहेरच्या परिस्थितीमुळेच फक्त नाही तर त्यांना मनातल्या मनातही सतत भेडसावत राहणाऱ्या भीतीमुळे जाणवणारा बंदिवास, या सगळ्याचे ॲना फ्रँकने जे वर्णन केले आहे ते वाचले, आणि युद्धामुळे झालेल्या सर्वात मोठ्या विनाशाची मला अगदी खोलवर आणि धक्कादायक अशी एक जाणीव झाली ती म्हणजे त्या परिस्थितीत झालेले मानवी मनाचे अध:पतन.

पण त्याचवेळी शेवटी याच मनाचा दिसणारा प्रकाशमय, चैतन्यमय असा उमदेपणाही ॲनाच्या या डायरीत अगदी स्पष्टपणाने, मर्मभेदकपणे समोर येतो. रोजच्याच जगण्यात एवढा थरार, एवढा त्रास आणि मानहानी अनुभवाला येत असूनही या लोकांनी हार मानली नाही, अगदी ॲनानेसुद्धा नाही. तिची हीच प्रतिमा या पुस्तकातून अगदी स्पष्टपणे समोर येते आणि आपले मन हेलावून टाकते.

खरं तर, वयाच्या तेरा ते पंधरा वर्षे या महत्त्वाच्या काळात प्रत्येक मुलीच्या आयुष्यात खूप वेगाने बदल होतात आणि ते पेलणं तिच्यासाठी खूप अवघड असतं; पण याच दोन वर्षात ॲना मात्र अगदी झपाट्याने मोठी झाली, परिपक्व झाली. स्वत:च्या मनातली कळकळ, स्वत:ची बुद्धिमत्ता आणि वैयक्तिक आयुष्यात तिला समृद्धपणाने साथ देणारी तिची हिकमत या सगळ्या गोष्टींमुळे अशाही परिस्थितीत ॲना तग धरून राहिली. अत्यंत संवेदनक्षम, अत्यंत प्रज्ञावान

आणि मृत्यूचे अजिबात भय वाटत नसलेल्या, नुकत्याच तारुण्यात पदार्पण करणाऱ्या एखाद्याने लिहाव्यात, अशाच गोष्टींवर ॲनाने जास्तीत जास्त विचार केला आहे आणि त्याबद्दलच लिहिले आहे. जसे की, तिच्या पालकांशी असणारे तिचे नाते, स्वत:बद्दल होणारी वाढती जाणीव, वाढत्या वयातल्या समस्या, आणि असेच काही.

अतिशय विलक्षण अशा परिस्थितीत जगणाऱ्या, कुमारवयातील एका मुलीचे हे विचार आहेत, तिच्या भावनांची अभिव्यक्ती आहे आणि म्हणूनच ही डायरी आपल्याला आपल्या स्वत:बद्दल आणि आपल्या मुलांबद्दलही बरंच काही सांगून जाते. आणि याच कारणामुळे ॲनाचे अनुभव आपल्या सर्वांच्याच खूप जवळचे आहेत. आपण तिच्या अल्पशा आयुष्यात आणि एकूणच सगळ्या जगात खूप गुंतून जातो, असं मला वाटतं.

ॲनाची ही डायरी, हे तिच्या शुद्ध सात्त्विक मनाचे अगदी यथायोग्य असे स्मारक तर आहेच; पण ज्यांनी शांततेसाठी आतापर्यंत प्रयत्न केले, काम केलं आणि जे अजूनही तसे प्रयत्न करत आहेत, त्या सर्वांच्याच शुद्ध मनाचं, विचारांचं ते स्मारक आहे. ही डायरी वाचणं हा खरोखरच एक समृद्ध आणि काहीतरी पदरात टाकणारा असा अनुभव आहे.

**–एलेनॉर रुझवेल्ट**

✦

१२ जून १९४२ रोजी लिहिलेल्या एका मजकुरात ॲनाने या डायरीबद्दलही कृतज्ञता व्यक्त केली आहे ती अशी–

''मला आशा आहे की, मी तुझ्यावर अगदी पूर्णपणे विश्वास टाकू शकेन, जो मी आजपर्यंत कोणावरच टाकू शकलेली नाही आणि मला अशीही आशा आहे की, तू माझा फार मोठा आधार ठरशील, मला दिलासा देशील.''

## रविवार, १४ जून १९४२

शुक्रवारी म्हणजे १२ जूनला मला सकाळी ६ वाजताच जाग आली, यात काहीच आश्चर्य नाही, कारण त्या दिवशी माझा वाढदिवस होता; पण अर्थातच मला इतक्या लवकर उठण्याची परवानगी नव्हती, त्यामुळे पावणेसात वाजेपर्यंत मला माझी उत्सुकता कशीतरी रोखून ठेवावी लागली. मग मात्र मला धीर धरवेना. मी उठून आमच्या जेवणाच्या खोलीत गेले. तिथे माझ्या लाडक्या मांजरीने, म्हणजे मूर्जीने, माझ्या पायाशी लाडाने अंग घासत माझे जणू मनापासून स्वागत केले.

सात वाजल्या-वाजल्या मी माझ्या मम्मी-डॅडींकडे गेले आणि त्यांना भेटून लगेच मग मला मिळालेल्या भेटवस्तू पाहण्यासाठी सरळ आमच्या बैठकीच्या खोलीत गेले. मला शुभेच्छा देणारी पहिली भेट 'तू' होतीस आणि हीच बहुधा सर्वात छान भेट होती. याचबरोबर त्या टेबलावर गुलाबाच्या फुलांचा एक गुच्छ होता, एका छोट्या कुंडीत लावलेले एक छोटे रोप होते आणि पियोनीची काही फुलेही होती. नंतर दिवसभर आणखीही बऱ्याच भेटवस्तू मिळाल्या.

माझ्या मम्मी-डॅडींनी तर माझ्यासाठी खूप साऱ्या वस्तू आणल्या होत्या आणि नंतर त्या बघताना माझ्या मित्र-मैत्रिणींनी त्या सगळ्या वस्तू पूर्णपणे विस्कटून टाकल्या. मिळालेल्या इतर भेटवस्तूंमध्ये 'कॅमेरा ऑब्स्क्यूरा' नावाचं एक पुस्तक होतं, सगळ्यांना मिळून खेळता येईल असा एक खेळ होता, वेगवेगळ्या प्रकारची भरपूर मिठाई होती, चॉकलेट्स होती, एक कोडे होते, फ्रॉकला लावायचा एक छान ब्रूच होता. शिवाय गोष्टींची काही पुस्तके, जोसेफ कोहेन यांनी लिहिलेलं 'लीजन्डस् ऑफ दी नेदरलँड' हे पुस्तक, 'डेझीज माउन्टन हॉलिडे' नावाचं एक भीतिदायक पुस्तक, अशी पुस्तकं होती आणि काही पैसेही भेट म्हणून मिळाले होते. या पैशातून मी आता 'दी मिथ्स् ऑफ ग्रीस ॲन्ड रोम' हे पुस्तक आणू शकते-वा किती छान!

थोड्या वेळाने लीस मला बोलवायला आली आणि आम्ही दोघी शाळेत गेलो. मधल्या सुट्टीत मी वर्गातल्या प्रत्येकाला गोड बिस्किटे दिली आणि मग आम्ही परत वर्गात गेलो.

आता मात्र मला इथेच थांबायला पाहिजे हं! बाय-बाय! आपण आता अगदी जिवलग मैत्रिणी होणार आहोत बरं का! बाय!...

## सोमवार, १५ जून १९४२

काल रविवारी दुपारी आमच्या घरी माझ्या वाढदिवसाची पार्टी झाली. रिन–टिन टिनचा 'दी लाइट हाऊस कीपर' हा सिनेमा आम्ही दाखवला आणि शाळेतल्या माझ्या मित्र–मैत्रिणी तो पाहून खूपच खूश झाल्या. त्या पार्टीच्या वेळी आम्ही खूप मजा केली. खूप मुलं–मुली जमले होते. पुढे मी कोणाशी लग्न करणार हे जाणून घ्यायला माझी मम्मी नेहमीच उत्सुक असते. तिच्या अंदाजानुसार, तो मुलगा पीटर वेसेल असेल असं तिला वाटतं; पण मग एक दिवस, अजिबात न लाजता किंवा डोळ्याची पापणीही न हलवता तिच्याशी बोलून तिच्या मनातली ही कल्पना मी पार पुसून टाकली. लीस गूसेन्स् आणि सॅन हाऊटमन या माझ्या अनेक वर्षांपासूनच्या अगदी जिवलग मैत्रिणी आहेत. ज्यूइश सेकंडरी स्कूलमधल्या जोपी डी वाललाही मी पूर्वीपासूनच ओळखत होते. खूप दिवसांपासून आम्ही शाळेत बरोबरच होतो आणि ती आता माझी अगदी सगळ्यात जवळची मैत्रीण झाली आहे. लीसची आता दुसऱ्याच एका मुलीशी जास्त मैत्री झाली आहे आणि सॅनने शाळाच बदलल्यामुळे तिथे तिला आता नवीन मैत्रिणी मिळाल्या आहेत.

## शनिवार, २० जून १९४२

मधले काही दिवस मी काहीच लिहिले नाही, कारण त्याआधी मला माझ्या डायरीबद्दल जरा विचार करायचा होता. माझ्यासारख्या मुलीने डायरी लिहायची, ही जरा विचित्रच कल्पना आहे. मी यापूर्वी कधी असं काही केलं नाही, हे त्याचं कारण नाही, तर तेरा वर्षांच्या एका शाळकरी मुलीच्या विचारांमध्ये, तिच्या मनातल्या भावभावनांमध्ये मला स्वत:लाच नाही, तर इतर कुणालाही काय रस असणार, असं मला वाटत होतं; पण तरीही, यामुळे काय फरक पडणार आहे! मला लिहावंसं वाटतंय आणि त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे, माझ्या हृदयात जणू गाडल्या गेल्यासारख्या असणाऱ्या अनेक प्रकारच्या गोष्टींना व्यक्त करण्याची, उजाळा देण्याची माझी इच्छा आहे. बस!

अशी एक म्हण आहे की, 'माणसापेक्षा कागद जास्त सहनशील असतो.' एक दिवस मी काहीशा खिन्न मन:स्थितीत असताना मला याचा अनुभव आला. त्या दिवशी अशीच, मी हनुवटीला हात लावून उदासपणे बसले होते. मला खूप कंटाळा आला होता, इतका की, बाहेर कुठे जावं की घरातच बसून राहावं हेही मला ठरवता येत नव्हतं आणि हो, तेव्हाच मला पटलं की, माणसापेक्षा कागद जास्त सहनशील असतो यात शंकाच नाही. कार्डबोर्डचं कव्हर घातलेली आणि मोठ्या गर्वाने स्वत:ला 'डायरी'

म्हणवून घेणारी ही वही, दुसऱ्या कुणालाही तोपर्यंत दाखवण्याचा माझा हेतू नाही, जोपर्यंत मला अगदी सच्चा मित्र किंवा मैत्रीण सापडत नाही. अर्थात बहुधा कुणालाच माझ्याबद्दल तसं काही वाटत नसावं आणि आता मला एक गोष्ट अगदी मुळातूनच कळली आहे, ज्यामुळे ही डायरी लिहिण्यास मी उद्युक्त झाले आहे. ती म्हणजे, मला खरंतर अगदी  जिवलग असा मित्र किंवा मैत्रीणच नाहीये!

थोडं स्पष्टच करून सांगते. तेरा वर्षाच्या मुलीला 'जगात आपण अगदी एकटे पडलो आहोत' असं वाटतंय, यावर कोणी विश्वासच ठेवणार नाही आणि खरं तर प्रत्यक्षातही तसं काही नाहीय. मला माझे अगदी लाडके असे आई-वडील आहेत आणि सोळा वर्षांची बहीणही आहे. मला अशी जवळपास तीस माणसं तरी माहिती आहेत, ज्यांना मित्र म्हणता येईल, अनेक मुलं माझे मित्र आहेत, जे माझं ओझरतं दर्शन घ्यायलाही उत्सुक असतात आणि ते जमलं नाही तर वर्गातल्या आरशांमधून डोकावून माझ्याकडे पाहात असतात. मला नातेवाईक आहेत, काका-मामा-आत्या- मावशी सगळे आहेत, जे माझे लाडके आहेत. आमचं एक छान घरही आहे. माझ्याकडे खरं तर कुठल्याच गोष्टीची कमतरता नाही; पण माझ्या सगळ्या मैत्रिणींच्या बाबतीतसुद्धा हे सगळं असंच आहे. आमची मैत्री म्हणजे नुसती मौज-मजा, गप्पा-विनोद, बास; बाकी याहून जास्त काहीच नाही. या सगळ्यांसाठी सारख्याच असणाऱ्या गोष्टींच्या पलीकडे जाऊन, दुसऱ्या कुठल्याही विषयावर मी आपणहून बोलू शकत नाही. आम्ही सर्वजणी एकमेकींच्या याहून अधिक जवळ येऊ शकू असं वाटत नाही आणि माझ्या त्रासाचं हेच मूळ कारण आहे. कदाचित, माझाच आत्मविश्वास कमी पडत असेल; पण काहीही असलं तरी हे एक चिवट सत्य आहे आणि त्याबाबत मी काही करू शकेन, असं मला वाटत नाही.

म्हणून हा डायरी लिहिण्याचा प्रयत्न! ज्या मैत्रिणीची मी इतके दिवस थांबून वाट पाहते आहे, तिचं चित्र माझ्याच मनात आणखी आणखी स्पष्ट मोठं व्हावं, या उद्देशाने, इतर लोकांसारखी रूक्ष आणि कंटाळवाण्या, रोजच्याच घटनांची मालिकाच या डायरीत लिहावी, असं मला वाटत नाही; पण याउलट ही डायरीच स्वत: माझी मैत्रीण व्हावी असं मला वाटतं आणि या माझ्या मैत्रिणीशी मी 'किटी' या नावाने बोलणार आहे. किटीला लिहायच्या या पत्रात मला जे लिहावंसं वाटतंय ते जर मी एकदमच लिहायला सुरुवात केली, तर मी कशाबद्दल बोलते आहे हे कोणालाच कळणार नाही. म्हणून, थोड्या नाखुशीनेच मी आधी माझ्याबद्दल, माझ्या आयुष्याबद्दल थोडक्यात काही सांगणार आहे.

माझ्या वडिलांनी वयाच्या छत्तिसाव्या वर्षी, तेव्हा पंचवीस वर्षांच्या असणाऱ्या माझ्या आईशी लग्न केलं. १९२६ साली जर्मनीमधील फ्रँकफर्ट या शहरात माझी बहीण मारगॉट हिचा जन्म झाला. नंतर १९२९ साली बारा जूनला माझा जन्म झाला. आम्ही

ज्यू आहोत. १९३३ साली आम्ही हॉलंडमध्ये राहायला गेलो. तिथल्या 'ट्रॅव्हीज् एन. व्ही.' या कंपनीमध्ये माझ्या वडिलांना मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून नोकरी मिळाली. माझे वडील ज्या कंपनीत भागीदार होते, ती 'कोलन ॲन्ड कं.' ज्या इमारतीत होती, त्याच इमारतीत ही नवी कंपनी होती आणि या दोन कंपन्यांचे परस्पर संबंध खूप चांगले होते.

पण आमच्या इतर कुटुंबीयांना मात्र, हिटलरच्या ज्यू-विरोधी कायद्यांचा चांगलाच फटका बसत होता. त्यांची आयुष्यं चिंतेने, अस्वस्थपणाने अगदी व्यापून गेली होती. ज्यू लोकांचा ठरवून केलेला छळ सुरू झाल्यावर, १९३८ साली माझ्या दोन काकांनी कसेतरी करून अमेरिकेत पळून जाण्याचे धाडस केले. ७३ वर्षांची माझी म्हातारी आजी आमच्याकडे राहायला आली. १९४० सालच्या मे महिन्यानंतर, तोपर्यंतचे चांगले दिवस जणू भुर्रकन उडून गेले : आधी युद्ध झालं, मग शरणागतीची नामुष्की आली, पाठोपाठ जर्मन लोकांची जणू धाडच आली आणि आम्हा ज्यू लोकांचे भोग खऱ्या अर्थाने सुरू झाले. ज्यू लोकांविरुद्ध काढलेली वेगवेगळी फर्माने एकापाठोपाठ एक येण्यास सुरुवात झाली. ज्यू लोकांनी आपल्या कपड्यांवर ठळकपणे दिसेल असे पिवळ्या रंगाचे चांदणीचे चित्र लावण्याची सक्ती सुरू झाली. ज्यू लोक इतरांपेक्षा अगदी ठळकपणाने वेगळे दिसावेत म्हणून जर्मनांनी ही सक्ती केली होती. ज्यू लोकांनी स्वत:च्या सायकलीच फक्त वापरायच्या असा नियम करण्यात आला. त्यांनी ट्राम वापरायच्या नाहीत किंवा चालवायच्याही नाहीत, अशा प्रकारची बंदीही घातली गेली. ज्यूंना बाजारहाट करायलाही दुपारी ३ ते ५ एवढ्याच वेळात परवानगी होती आणि 'ज्यूईश शॉप' अशी पाटी असणाऱ्या दुकानातच फक्त खरेदी करायची अशीही सक्ती होती. रात्री ८ वाजेपर्यंत सगळ्या ज्यूंनी आपापल्या घरी परतायचं, त्यानंतर स्वत:च्या घराच्या बागेतही दिसायचं नाही, दारेही उघडायची नाहीत अशी ताकीद होती. नाट्यगृह, चित्रपटगृह किंवा करमणुकीच्या इतर कोणत्याही ठिकाणी जाण्यास ज्यू लोकांना मज्जाव होता. सार्वजनिक खेळांमध्ये ज्यू लोक भाग घेऊ शकत नव्हते. पोहण्याचे तलाव, टेनिस-कोर्ट, हॉकीची मैदाने किंवा इतर कोणत्याही मैदानावर जाण्यास त्यांना बंदी होती. ज्यूंनी ख्रिश्चनांना भेटायचे नाही असा दंडक होता. ज्यूंनी ज्यूईश शाळांमध्येच जायचं, इतर शाळांमध्ये नाही. ही आणि आणखी अशी कितीतरी बंधनं ज्यू लोकांवर घातली गेली होती.

थोडक्यात, आम्ही अमुक-तमुक गोष्टी करू शकत नव्हतो आणि अमुक-तमुक गोष्टी करायला आम्हाला मनाई होती; पण इतकी सगळी त्रासदायक परिस्थिती असूनही आयुष्यं पुढे सरकतच होती. जोपी नेहमी मला म्हणायची की, 'तुम्ही कोणतीही गोष्ट करायला घाबरता, कारण तसं करण्यावर कधीही बंदी येऊ शकते.'' आमच्या स्वातंत्र्यावर अगदी कडक बंधनं होती; पण इतकं असूनही गोष्टी तरीही सहन करण्यासारख्या होत्या.